**MHKO070001291998**

## नियमित दिवाणी दावा क्र.१४८/१९९८

## निशाणी क्र.१९७ खालील आदेश.

**(स्वस्तीश्री जिनसेन भट्टारक पट्टाचार्य वगैरे वि.कमल पाटील वगैरे )**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ३ व ५ ते ७ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका ७ नियम ११–ड व कलम १५१ अन्वये दावा फेटाळण्याकरीता दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी क्र.१ ते ३ व ५ ते ७ यांनी असे कथन केले की, प्रस्तुतचा दावा कब्जा मागणीसाठी दाखल केला आहे. वादी क्र.१ ही नोंदणीकृत सार्वजनिक न्यास असल्याचे वादींच्या वादकथनात नमूद आहे. त्यावरुन वादींनी दावा दाखल करणेपुर्वी चॅरीटी कमिशनरची परवानगी घेतली नसल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते. तसेच कायद्यातील तरतुदींनुसार प्रस्तुत दावा चालविणेबाबत प्रस्तुत वादी यांना अधिकार असलेबाबत दावाअर्जित वाद कथन नसल्याने देखील प्रस्तुतचा दावा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० (दि बॉम्बे पब्लीक ट्रस्ट) मधील तरतुदींनुसार फेटाळण्यात यावा. तसेच प्रस्तुत दावा अर्जातील वादी सदरातील कलम २ मध्ये वादी यांचेबाबत मयत असे नमुद केले आहे. परंतु तद्नंतर त्याबाबत वादींनी दावा अर्जित कोणत्याही स्वरुपाचे कथन नमूद केलेले नाही. वादी क्र.४, ८ व १० हे मयत असल्याचे नि.क्र.१ मध्ये नमुद आहे. सबब कारणास्तंव वादीचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता (अमेंडेड) व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० च्या तरतुदींनुसार चालणेस पात्र नाही.

०३. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, दावा अर्जी कलम १ मध्ये वर्णन केलेली जमीन ही प्रतिवादी यांचेकडे कुळ नात्याने कब्जा व वहिवाटीस असल्याचे कलम ४ मध्ये नमुद केले आहे. त्यामुळे द बॉम्बे टेनन्सी ॲंड ॲग्रीकल्चरल लॅंड ॲक्ट, १९४८ च्या तरतुदीनुसार दावा फेटाळण्यात यावा. तसेच संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १९८२ मधील तरतुदींची बाधा येत असलेने प्रस्तुतचा दावा फेटाळण्यात यावा. सबब, प्रस्तुतचा अर्ज उपरोक्त कारणांकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११–ड व कलम १५१ नुसार फेटाळण्याची विनंती प्रतिवादींनी केली.

०४. प्रस्तुत अर्जास वादींनी नि.क्र.१९९ अन्वये म्हणणे दाखल करुन अर्ज अमान्य केला असून अर्ज चालणेस पात्र नसल्याचे कथन केले. त्यांनी पुढे असे कथन केले की, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० चे कलम ५० व त्याच्या प्रोव्हीझोप्रमाणे चॅरिटी कमिशनर यांची परवानगी सार्वजनिक विश्वस्तबाबत विषय असल्यास घेणे जरुरी दिसते. पण सार्वजनिक विश्वस्त मिळकतीपुरता दावा असेल तर अशी परवानगीची गरज नाही. प्रतिवादी ट्रेसपासर/तथाकथीत कूळ यांचेविरुध्द दावा दाखल करणेसाठी चॅरिटी कमिशनर यांची परवानगी घेणे जरुरी नाही. वादीला दावा चालविण्याचा अधिकार कायदाच गृहीत धरत असल्याने त्याबाबत वेगळया कथनाची गरज नाही. सदर दोन्ही तक्रारी प्रतिवादींनी त्यांच्या नि.क्र.१३ च्या कैफियतीमध्ये उपस्थित केल्या नसल्याने त्या मुद्दयावर आदेश ७ नियम ११ खाली प्रतिवादींना अर्ज देता येणार नाही. नि.क्र.२५ ला काढलेल्या मुद्दयामध्ये देखील सदर तक्रारी संदर्भात मुद्दे काढलेले नाहीत व २५ वर्षानंतर प्रतिवादींनी सदर तक्रारी उपस्थित केल्या आहेत.

०५. वादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादी क्र.२ मयत झाल्यानंतर त्यांच्या ठिकाणी ज्या स्वस्तीश्री जिनसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामींची नेमणूक करण्यात आली त्यांच्या नावाचा उल्लेख २(अ) मध्ये असे लिहून त्यापुढे करण्यात आला आहे. तसेच वादी क्र.४, ८ व १० हे मयत

झालेनंतर अनुक्रमे ४–अ, ८–अ व १०–अ या ट्रस्टींची नेमणूक ट्रस्ट कमिटीच्या मिटींगमधील बहुमतानुसार करण्यात आली आहे. सदर तक्रारी प्रतिवादींनी दावा दुरुस्तीनंतर व वादींच्या मृत्युनंतर स्वतंत्रपणे कैफियत देवून हरकती घेतलेल्या नाहीत. वादी यांनी प्रतिवादी यांचे कूळ नाते संपत्ती हस्तांतरण कायद्याचे कलम १०६ नुसार रद्द केले असल्याने अशा कूळ विरुध्दचा दावा हा फक्त दिवाणी न्यायालयात चालणेस पात्र आहे. प्रतिवादींनी घेतलेल्या तक्रारीबाबत विशिष्ट नकार नसल्याने आदेश ८ नियम ५ (१) प्रमाणे त्या गोष्टी त्यांना मान्य आहेत अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे अशा तक्रारी प्रतिवादींना या अर्जान्वये उपस्थित करता येणार नाहीत. प्रस्तुत प्रकरणात वादीतर्फे तोंडी पुरावा संपलेला असून प्रतिवादी यांना काम चालवण्यात रस नसून काम लांबवणेच्या हेतूने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. करीता प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्याची विनंती वादींनी केली आहे.

**०६.** उभयतांच्या कथनांवरुन खालील मुद्दे माझे विचारार्थ आले असून त्याचे कारणांसहित निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रस्तुत दाव्यास मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५०, दिवाणी प्रक्रिया संहिता (अमेंडेड), संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १९८२ व मुंबई कूळ वहिवाट अधिनियम यापैकी कोणत्याही कायद्याची बाधा येते काय ? | नकारार्थी |
| २. | दावा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(ड) अन्वये फेटाळण्यास पात्र आहे काय ? | नकारार्थी |
| ३. | दावा चालणेस पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**०७.** वादीतर्फे विधीज्ञ श्री.एम.व्ही.अर्जुनवाडकर व प्रतिवादी यांच्यातर्फे विधीज्ञ श्री.ए.वाय.भोसले यांचा युक्तीवाद श्रवण केला.

**०८.** प्रतिवादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ नुसार दाखल केलेला अर्ज निकाली करताना फक्त वादपत्र विचारात घेणे अनिवार्य असून न्यायालयाने कैफियत किंवा इतर कागदपत्रे विचारात विचारात घेवू नये. तसेच सदरचा अर्ज निर्णयीत करताना कोणत्या बाबी पाहण्याची आवश्यकता आहे हे सांगण्याकरीता त्यांनी खालील मा.सर्वोच्च व उच्च न्यायालयांचे न्यायनिवाडे दाखल केले आहेत.

| | |
|---|---|
| 1. | *Dahiben vs. Arvindbhai Kalnyaji Bhanushali and ors., AIR 2020 (0) (SC) (CIV) 3310.* |
| 2. | *Sandip Polymers Pvt. Ltd. vs. Bajan Auto Ltd. And ors., AIR 2007 (0) (SC) 2656.* |
| 3. | *C.S.Ramaswami vs. V.K.Senthil, MhLJ 2023 (2) 161.* |
| 4. | *Sopan Sukhdev Sable and ors. vs. Assistant Charity Commissioner and ors., AIR 2004 (0) (SC) 1801.* |
| 5. | *Umesh Chandra Saxena vs. Administer General, U.P. Allahabad AIR 1999 (0) (ALL) 109.* |
| 6. | *Ganesh Trading Co. vs. Mujiram, AIR 1978 (0) (SC) 484.* |

**०९.** वादीतर्फे युक्तीवाद करण्यात आला की, जेव्हा प्रतिवादीतर्फे घेण्यात आलेली हरकत ही कायदा व परिस्थितीचा संमिश्र प्रश्न असेल तेव्हा फक्त वादपत्रावरुन आदेश ७ नियम ११ चा अर्ज निकाली करता येणार नाही. त्याकरीता दावेकामी पुरावा दाखल होणे आवश्यक आहे.

**१०.** उभयतांची कथने,उपरोक्त मा.न्यायालयांच्या न्यायनिवाडयातील निर्देशने विचारात घेता अ से स्पष्ट होते की, न्यायालय कोणत्याही स्तरावर स्वतः आदेश ७ नियम ११ मधील तरतुदींप्रमाणे दावा फेटाळू शकते व आदेश ७ नियम ११ चा अर्ज निकाली करताना वादपत्रातील कथने विचारात घेणे अनिवार्य आहे. परंतु जर प्रतिवादीने उपस्थित केलेले प्रश्न हे संमिश्र स्वरुपाचे म्हणजे कायदा व परिस्थितीचे संमिश्र प्रश्न असतील त्यावेळी फक्त वादपत्रावर विसंबून अर्ज निर्णयीत करता येणार नाही. त्यासाठी दावेकामी पक्षकाराचे पुरावे दाखल होवून सदरचे प्रश्न निर्णयीत करणे आवश्यक आहे.

**११.** प्रतिवादीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, वादीमार्फत पाठविण्यात आलेली नोटीस ही वटमुखत्यार भुजगोंडा दादा पाटील यांनी पाठवली होती व त्यांना नोटीस पाठवण्याचा अधिकार नाही. तसेच वादी क्र.२ हे वादी क्र.१ या न्यासाचे विश्वस्त असून त्यांचेमार्फत त्यांचे वटमुखत्यार भुजगोंडा दादा पाटील यांना दावा दाखल करणेचा अधिकार नाही. तसेच वटमुखत्यारपत्रामध्ये देखील विश्वस्ताबाबत प्रशासन व व्यवस्थापन या व्यतिरिक्त दावा दाखल करण्याचा अधिकार दिल्याचे नमूद नाही. नि.क.१८६ वरील वटमुखत्यारपत्राचे अवलोकन केले असता दावा दाखल करणेचा अधिकार दिल्याबाबतचे स्पष्ट नमुद नसले तरी दिवाणी कोर्टात व अन्य कोर्टात सर्व काम पाहणे, सदर बाबतीत आवश्यक ती सर्व कामे पाहणेचा अधिकार दिल्याचे नमुद आहे. त्यामुळे वटमुखत्यारधारकास दावा दाखल करण्याचा अधिकार नसल्याच्या प्रतिवादीच्या कथनात कोणेतेही तथ्य नाही. महत्वपुर्ण बाब म्हणजे द बॉम्बे पब्लीक ट्रस्ट ॲक्टच्या तरतुदीमध्ये एखाद्या संस्थेने

वटमुखत्यारपत्राआधारे एखाद्या व्यक्तीस अधिकार देवू नये अशाबाबतची कुठलीही तरतूद असल्याचे दिसून येत नाही. अशा परिस्थितीत वटमुखत्यार भुजगोंडा पाटील यांना दावा दाखल करणेचा किंवा प्रतिवादींना नोटीस पाठवणेचा अधिकार नव्हता या प्रतिवादीच्या कथनात सत्यांश दिसत नाही.

**१२.** याशिवाय **"ए.आय.आर १९८९ अलाहाबाद ५१, प्रेमप्रकाश जोहर वि.हिज हायनेस श्री.महाराजा विभूती नारायणसिंग बहादूर"** या अवतरणामध्ये नेमून दिलेल्या वटमुखत्यार यांनी संपत्ती हस्तांतरण कायद्याचे कलम १०६ प्रमाणे भाडे करार रद्द करण्यासंदर्भात नोटीस दिल्यास ती वैध राहील असे निर्देशीत केलेले आहे. अशा स्थितीमध्ये वादीतर्फे वटमुखत्यार यांना नोटीस देणेचा अधिकार नव्हता हे मान्य करता येणार नाही.

**१३.** प्रतिवादींतर्फे कथन व युक्तीवाद करण्यात आला की, दावा कलम १ मध्ये वादी हे मयत असे लिहीलेले असून त्यांच्याबाबत दावा अर्जीमध्ये काहीही नमूद केले नाही. वादीतर्फे युक्तीवाद केला की, वादीपैकी काही वादी हे दावा प्रलंबित असताना किंवा दाव्यादरम्यान मयत झाले असल्याने त्याबाबतची आवश्यक दुरुस्ती वादीने केली आहे. वादी क्र.२ मयत झाल्यानंतर त्यांच्या ठिकाणी ज्या स्वस्तीश्री जिनसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामींची नेमणूक करण्यात आली त्यांच्या नावाचा उल्लेख २(अ) मध्ये असे लिहून त्यापुढे करण्यात आला आहे. तसेच वादी क्र.४, ८ व १० हे मयत झालेनंतर अनुक्रमे ४-अ, ८-अ व १०-अ या ट्रस्टींची नेमणूक ट्रस्ट कमिटीच्या मिटींगमधील बहुमतानुसार करण्यात आली आहे.

**१४.** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की वादी हे दावा प्रलंबित असताना दरम्यान मयत झाले असून वादीने अर्ज दप्तरी दाखल करुन दावा अर्जीमध्ये दुरुस्ती करुन घेतल्याचे स्पष्ट दिसते. त्यामुळे दावा अर्जीच्या मजकूरामध्ये पुन्हा उल्लेख करणेची आवश्यकता नाही. त्यामुळे प्रतिवादींनी घेतलेल्या हरकतीमध्ये कोणतेही तथ्य नाही.

**१५.** प्रतिवादीतर्फे युक्तीवाद करण्यात आला की, भाडेकरार रद्द करण्यासंबंधीची संपत्ती हस्तांतरण कायद्याचे कलम १०६ प्रमाणेची नोटीस सर्व ट्रस्टींनी देणे अनिवार्य आहे. त्यापृष्टयर्थ त्यांनी खालील न्यायनिवाडयांचा आधार घेतला.

| | |
|---|---|
| 1. | *Jamir Ahmad vs. Madhawanand, AIR 1979 (0) (ALL) 104.* |
| 2. | *Fakir Charan Das vs. Satchidananda Raiguru, AIR 1972 (0) (ORI) 26.* |

**१६.** वादीतर्फे युक्तिवाद करण्यात आला की, वादी क्र.२ यांचेतर्फे वटमुखत्यार भुजगोंडा पाटील यांनी १०६ प्रमाणे भाडेकरार रद्द करणेची नोटीस दिलेली आहे. वादपत्राचे अवलोकन केले असता असे दिसते की, वादी क्र.१ ही सार्वजनिक न्यास असून दावा दाखल करताना वादी क्र.२ हे सदर न्यासाचे एकमेव विश्वस्त होते. त्यामुळे वादी क्र.२ तर्फे वटमुखत्यार भुजगोंडा पाटील यांनी प्रतिवादींना नोटीस दिलेली आहे. त्यामुळे सर्व विश्वस्तांनी नोटीस देणे आवश्यक आहे या मा.न्यायालयाच्या न्यायनिवाडयातील निर्देशाचे पालन झालेचे दिसून येते.

**१७.** प्रतिवादीतर्फे युक्तीवाद करण्यात आला की, सर्व विश्वस्ताना दावेकामी पक्षकार करणे आवश्यक आहे व त्यांनी त्यांच्या कथनांच्या पृष्टयर्थ खालील न्यायनिवाडयांचा आधार घेतला.

| | |
|---|---|
| 1. | *Vedakannu Nadar and ors. vs. Nanguneri Taluk Singikulam Annadana Chatram through its huktdars Medai Dalavoi Ranganatha Maudaliar and Ors., AIR 1938 (0) (MAD) 982.* |

| | |
|---|---|
| 2. | *Duli Chand vs. Mahadir Pershad Trilok Chand Charitable Trust, AIR 1984 (0) (DEL) 145.* |
| 3. | *Abaji Daulata Yadav vs. Dhondiram Jagedevrao Yadav and ors., MHLJ 1993 (1) 588.* |
| 4. | *Namdev vs. Sahi Gupta Masjid Chandrapur & ors., MhLJ 2014(4) 209.* |
| 5. | *Rajabhau Damodar Raikar vs. The Assistant Charity Commissioner, Pune & Others, MhLJ 2015 (4) 275.* |
| 6. | *Atmaram Ranchhodhai vs. Gulamhusen Gulam Mohiyaddin, AIR 1973 (0) (GUJ) 113.* |

**१८.** वादीतर्फे युक्तीवाद करण्यात आला की, वादी क्र.१ या न्यासाच्या सर्व विश्वस्तांना दावेकामी पक्षकार केलेले आहे व दावा दाखल करतेवेळी फक्त वादी क्र.२ हेच एकमेव विश्वस्त होते. वादपत्राचे अवलोकन केले असता वादी क.२ हे वादी क्र.१ या न्यासाचे एकमेव विश्वस्त होते असे वाद कथनांवरून दिसते. तसेच पी.टी.आर उतारा (नि.क्र.१६२) व दावेकामी दिलेले अर्ज पाहता दावा प्रलंबित असताना न्यासामध्ये नविन समाविष्ट केलेल्या विश्वस्तांना देखील दावेकामी वादी म्हणून न्यायालयाच्या परवानगी पक्षकार केल्याचे दिसते.

**१९.** प्रतिवादींतर्फे दाखल करण्यात आलेले खालील मा.न्यायालयांच्या न्यायनिवाडयातील मार्गदर्शक तत्वे ही प्रस्तुतचा अर्ज

निकाली करताना मदतीची व संबंधीत नसल्यामुळे ते अर्ज निकाली काढताना विचारात घेता आलेले नाहीत.

| | |
|---|---|
| 1. | *Union of India vs. Ibrahim Uddin & anr, 2013 (0) (SC) (CIV) 1571.* |
| 2. | *J.V.Gokal Charity Trust vs. Contrex Pvt. Ltd., 2016 (0) Supreme (BOM) 1210.* |
| 3. | *Udhav Singh vs. Madhav Rao Scindia, Supreme 1975 (0) (SC) 413.* |
| 4. | *Ram Sarup Gupata (dead) by L.Rs. vs. Bishun Nara, AIR 1987 (0) (SC) 1242.* |
| 5. | *Sheikh Abdul Kayum and ors. vs. Mulla Alibhai and ors., AIR 1963 (0) (SC) 309.* |
| 6. | *Jagatnarayansingh Swarupsing Chithere ors. vs. Swarupsingh Education Society anr., MhLJ 1980 (0) 372.* |

**२०.** प्रतिवादीच्या कथनानुसार वादी यांनी दावा दाखल करण्यापुर्वी चॅरीटी कमिशनरची परवानगी घेतलेली नाही. त्यांचेतर्फे विधिज्ञानी युक्तीवाद केला की, बॉम्बे पब्लीक ट्रस्टचे कलम ५० नुसार वादींनी दावा दाखल करणेपुर्वी चॅरीटी कमिशनरची परवानगी घेणे अनिवार्य आहे. परंतु प्रस्तुतकामी दावा दाखल करणेपुर्वी चॅरीटी कमिशनरची परवानगी घेतलेली नसल्याने सदर कायद्याच्या कलम ५० नुसार दावा चालणेस पात्र नाही.

**२१.** याउलट वादींच्या विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, पब्लीक ट्रस्ट (सार्वजनिक न्यास) बाबत विषय असल्यास चॅरीटी कमिशनरची परवानगी घेणे

आवश्यक असते. परंतु कलम ५० च्या प्रोव्हीजोनुसार पब्लीक ट्रस्ट मिळकतीबाबत दावा असेल तर चॅरीटी कमिशनरच्या परवानगीची गरज नाही. तसेच प्रतिवादी यांना संपत्ती हस्तांतरण कायद्याचे कलम १०६ ची नोटीस देवून त्यांचे कूळ रद्द करुनही त्यांनी दावा मिळकतीत कब्जा घेतलेला असून ते ट्रेसपासर म्हणून दावा मिळकत त्यांच्या कब्जेत आहे. त्यामुळे ट्रेसपासरच्या विरुध्द दावा दाखल करतेवेळी चॅरीटी कमिशनरच्या परवानगीची आवश्यकता नाही. त्यांनी त्यांच्या म्हणण्याच्या पृष्टयर्थ खालील न्यायनिवाडयांचा आधार घेतला.

1. **Leelavati W/O Vasantrao Pingle vs. Dattatrya Dhondiraj Kavishar, Decided on** 22/09/1987, 1988 (2) **Bom. CR** 429, *in which Hon'ble Bombay High Court observed that, a suit against a trespasser by trustees, as owners of the trust property, can be filed in the ordinary form under the Civil Procedure Code and it is not necessary to take recourse to section 50 of the Bombay Public Trust Act and obtain permission of the Charity Commissioner for instituting the same, has already been decided by this Court.*
2. **Gurisiddappa Tipanna Mugeri vs. Miraj Education Society, decided on** 03/11/1960, (1961) 63 **BOMLR**312, *in which it has been observed by Hon'ble High Court that, it is only in respect of disputes arising*

*out of administration of and management of the public trusts that the Charity Commissioner comes into the picture and Section 50 of the Act, provides that the Charity Commissioner or two or more persons interested in the trust can file a suit for the various reliefs that have been set out in Sub- clauses (a) to (A) of Clause (iii) thereof. In my opinion, the relief claimed in the present suit raises a dispute between the trust, which happens to be a public trust vis., the plaintiff, on the one side and a private person, who claims title in himself, on the other. It is not necessary for the institution of such a suit to obtain the consent of the Charity Commissioner. The consent of the Charity Commissioner under Section 50 of the Act is necessary for peersons who are not trustees but who are merely interested in the trust property.*

२२. प्रतिवादी यांनी चॅरिटी कमिशनरच्या दावा दाखलपुर्व परवानगी घेणेबाबत घेतलेली हरकतही त्यांच्या कैफियतीमध्ये घेतलेली नाही. तसेच आजतागायत कधीही घेतेली नाही. सदरचा प्रश्न हा कायदा व वस्तुस्थितीचा संमिश्र प्रश्न असून त्याबाबत मुद्दा गठीत करुन त्याबाबतचा निर्णय होणे आवश्यक आहे.

२३. उपरोक्त न्यायनिवाडयातील मा.न्यायालयाचे निर्देशाप्रमाणे दावा ट्रेसपासरच्या विरुध्द असल्यास प्रतिवादी कथन करतात त्याप्रमाणे दावा दाखल करणेपुर्वी चॅरिटी कमिशनरची परवानगी घेणे आवश्यक नाही. त्यामुळे वादीच्या कथनांत तथ्य असल्याचे दिसते. त्यामुळे दावा दाखल करणेपुर्वी चॅरिटी कमिशनरची परवानगी घेतली नाही म्हणून प्रस्तुत दावा फेटाळता येणार नाही.

२४. महत्वपुर्ण बाब म्हणजे प्रतिवादींनी त्यांच्या कैफियतीमध्ये वादी संस्थानतर्फे दावा दाखल करणेचा किंवा नोटीस देणेच्या अधिकाराबाबत तसेच चॅरीटी कमिशनरच्या परवानगी न घेतल्याबाबत किंवा प्रस्तुत अर्जात नमूद केलेप्रमाणे कोणतीही कथने किंवा हरकती घेतलेल्या नाहीत व दावा दाखल केल्याच्या २५ वर्षानंतर अशा प्रकारच्या हरकती प्रतिवादी घेत आहेत व अशा प्रकारच्या हरकती यापुर्वी का घेतल्या नाहीत याचे कोणतेही स्पष्टीकरण त्यांनी दिलेले नाही. यावरुन प्रतिवादींनी दावा लांबवणेच्या हेतूने प्रस्तुत अर्ज दाखल केल्याचे दिसते. यात वाद नाही की, आदेश ७ नियम ११ प्रमाणे न्यायालय स्वतः अधिकार वापरुन दावा फेटाळू शकते. परंतु प्रतिवादींनी उपस्थित केलेल्या हरकती किवा प्रश्न हे कायदा व वस्तुस्थितीचे संमिश्र प्रश्न असून त्याकरीता पक्षकाराचे पुरावे दप्तरी येणे आवश्यक आहे. जेव्हा एखादा मुद्दा हा कायदा व वस्तुस्थितीचा संमिश्र प्रश्न असतो तेव्हा त्या मुद्दयावर विना पुरावा दावा फेटाळता येत नाही अशी कायद्याची स्थिर स्थिती आहे.

२६. उपरोक्त चर्चा, उभयतांनी दाखल केलेल्या मा.न्यायालयाच्या न्यायनिवाडयातील मार्गदर्शक तत्वे व कायद्याची स्थिर स्थिती विचारात घेता प्रस्तुत दाव्यास या स्तरावर कोणत्याही कायद्याची बाधा येत नसल्याचे दिसते. त्यामुळे प्रतिवादी कथन करतात त्याप्रमाणे दावा आदेश ७ नियम ११ प्रमाणे फेटाळण्यास पात्र नाही. तसेच प्रस्तुत दावा चालणेस पात्र आहे. करीता मी मुद्दे क्र.१ व २ ची उत्तरे नकारार्थी व मुद्दा क्र.३ चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात

येतात. प्रतिवादींनी दावा लांबवणेच्या हेतूने प्रस्तुत अर्ज दाखल केल्याचे यापुर्वी नमुद केले असून प्रतिवादींनी घेतलेल्या वेळेसाठी खर्च आकारने न्यायोचित होईल. सबब, मुद्दा क्र.४ च्या निष्कषार्थ मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) अर्ज (नि.क्र.१९७) नामंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादी यांनी रक्कम रु.१०००/– खर्च म्हणून वादींना द्यावी.

ROHINI ASHOK JADHAV
Digitally signed by ROHINI ASHOK JADHAV
Date: 2024.04.22 19:53:20 +0530

दि.१८/०४/२०२४ (**रोहिणी अ.जाधव**)

जयसिंगपूर. २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

जयसिंगपूर